MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI, PUNE-17

# बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांचे लोकोपयोगी कार्य

– डॉ. तृप्ती सुभाष आंब्रे

## प्रास्ताविक–

खंडेराव गायकवाड हे बडोदे संस्थानाचे संस्थानिक होते. सन १८७० ला निपुत्रिक अवस्थेत त्यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांच्या पत्नी जमनाबाई यांना दत्तकपुत्र घेण्याची संमती ब्रिटिश सरकारने दिली. तेव्हा त्यांनी महाराष्ट्रातील सटाणा भागातील कवळाणा गावात असलेल्या गायकवाडांच्या वंशजांपैकी 'गोपाळ' नामक मुलास बुद्धीचे तेज आणि डोळ्यांतील आत्मविश्वास पाहून दत्तकवारस म्हणून निवडले. पुढे २७ मे १८७५ रोजी गोपाळचा राज्याभिषेक होऊन ते तिसरे सयाजीराव महाराज बनले. त्यांच्या शिक्षणासाठी १० डिसें. १८७५ ला एफ. एच. इलियट या तरुण आय.सी.एस. अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. सयाजीरावांच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. सन १८७९ मध्ये मि. इलियट यांनी रुलर्स ऑफ बडोदा हे पुस्तक लिहिले. त्यामध्ये ते म्हणतात, ''महाराजांच्या अंगी उद्योगप्रियता, दृढ निश्चय, आत्मसंयमन व नियमाधिनता हे स्थायी स्वरूपाचे गुण दिसून येतात.''[१] राजा हा प्रजेसाठी असतो व प्रजेचे कल्याण यातच राजाचे कल्याण आहे हा विचार त्यांच्या मनात याच काळात घट्टपणे रुजला होता. प्रजाहितदक्ष, दूरदृष्टीचे, पुरोगामी राजा म्हणून त्यांची ओळख आहे.

## सामाजिक – सांस्कृतिक कार्य –

संस्थानाचे दिवाणसर टी. माधवराव यांनी सयाजीराजांना राज्यकारभाराचे शिक्षण दिले. सन १८८१ मध्ये त्यांच्याकडे राजपदाची सर्व सूत्रे सोपविण्यात आली. राजपदी त्यांची निवड झाल्यानंतर त्यांनी राज्यभर दौरे करून राज्याची पाहणी केली आणि प्रजेची सुख–दुःखे जाणून घेतली आणि आयुष्यभर प्रजेच्या हिताची कामे केली. त्यासाठी राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्यावर त्यांनी भर दिला. प्रशासकीय जबाबदारीची विभागणी करून त्यात सुरळीतपणा आणला. आवश्यक तेथे सल्लागारांची नेमणूक करून विविध कल्याणकारी योजना राबवल्या. त्यांनी आपल्या सरकारात पहिल्यांदा शेतीखाते सुरू केले. शेतकऱ्यांच्या हितासाठी

त्यांनी अनेक गोष्टी केल्या. आपल्या राज्यातील जमिनीची योग्य प्रतवारी करण्यासाठी त्यांनी 'लँड सर्व्हे सेटलमेंट' हे खाते सुरू केले. सारावसुलीच्या पूर्वीच्या वेगवेगळ्या पद्धतीत सुधारणा करून सारावसुलीची समान पद्धत राज्यभर लागू केली. शेतीच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विहीर खोदायच्या कामास उत्तेजन दिले. आपल्या राज्याच्या न्यायव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्याचे कार्यही त्यांनी केले. त्यांनी राज्यातील पंचायतींचे पुनरुज्जीवन घडवून आणले ग्रामपंचायतीची मुहूर्तमेढ भारतात प्रथम बडोदा संस्थानात रोवली गेली ती सयाजीरावांच्या कारकिर्दीत. ग्रामपंचायतीच्या जोडीला तालुका पंचायत व नगरपालिका यांचीही स्थापना करण्यात आली. सयाजीरावांनी बडोदे संस्थानात अनेक शाळा काढल्या तसेच शेतकी शाळाही काढल्या. मुलांना व्यायामाची सवय व्हावी म्हणून शाळांमधून क्रीडा शिक्षण सक्तीचे केले. गावोगावी व्यायामशाळा उघडल्या. महिला शिकाव्यात म्हणून प्रौढ महिला वर्ग सुरू केले. मुस्लीम महिलांसाठी त्यांनी जनाना वर्ग काढले. राज्यात महिलांसाठी व्यायमशाळा काढल्या. त्यांनी १८८२ मध्ये एक हुकूम काढला. त्यानुसार सोनगढ भागात सरकारी खर्चाने (मोफत) अस्पृश्य आणि आदिवासींना शिक्षण देण्यासाठी शाळा सुरू केल्या. १८८२ मध्ये त्यांनी दलित आणि वंचितांसाठी एकूण १८ शाळा काढल्या. मोफत प्राथमिक शिक्षण आणि वसतिगृहाची सोय करण्याचा आदेश काढला. जगाच्या इतिहासात वंचितांच्या शिक्षणासंबंधीचा हा पहिला क्रांतिकारक निर्णय होता. १८९३ मध्ये सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना त्यांनी सुरू केली आणि टप्याटप्याने संपूर्ण राज्यभर लागू केली. १८९० मध्ये त्यांनी 'कलाभुवन' ही संस्था स्थापन करून तंत्रशिक्षणाला चालना दिली. याशिवाय संगीत, नृत्य, नाट्य यांसारख्या कलांचे शिक्षण देणारी शाळाही राज्यात उघडण्यात आली. गायन कलेला उत्तेजन देण्यासाठी सयाजीरावांनी उस्ताद फैयाजखान मौलाबक्षसारख्या कलाकारांना राजश्रय दिला. मौलाबक्ष हे बडोद्याच्या गायनशाळेचे पहिले प्राचार्य होते. त्यांचे चिरंजीव अल्लाउद्दीन यांना शिष्यवृत्ती देऊन सयाजीरावांनी परदेशात पाठवले. संगीतशास्त्रावरदेखील त्यांनी अनेक पुस्तके लिहून घेतली. विविध कला आणि साहित्याला राजांनी राजाश्रय दिल्याने बडोदा हे कलांचे माहेरघर म्हणून नावारूपाला आले होते. अनेक गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना त्यांनी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या देऊन त्यांच्या उच्च शिक्षणाची सोय केली. अनेकांना शिक्षण संशोधन कार्यासाठी परदेशात जाण्यास आर्थिक साहाय्य केले. राजांनी महाराष्ट्रातील बहुजनांच्या अनेक संस्थांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मोठी मदत केली.

शिक्षणप्रेमी जनता व नवशिक्षित विद्यार्थ्यांना ज्ञान विज्ञानाची माहिती मिळण्यासाठी ग्रंथाचे महत्त्व ओळखले. सर्व लोकांना मोफत व सहज ग्रंथसुविधा

प्राप्त होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. बडोदे संस्थान म्हणजे भारतातील ग्रंथालय चळवळीचा पाया मानला जातो. सयाजीरावांचे ग्रंथप्रेम आणि दानशूर वृत्ती त्यामागे होती. ग्रंथ हे प्रगतीचे आणि परिवर्तनाचे साधन आहे, हे त्यांनी जाणले होते, परंतु पूर्वीच्या काळी ग्रंथवाचन ही उच्चवर्गीयांची मिरासदारी होती. त्यामुळे सर्वसामान्य जनतेसाठी ग्रंथ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने भारतात सर्वप्रथम सयाजीरावांनी सर्व जातीधर्मांच्या लोकांसाठी मोफत सार्वजनिक ग्रंथालयांची चळवळ सुरू केली. त्यासाठी पुस्तकांच्या पेट्या घेऊन फिरती वाचनालये तयार केली. हे काम चांगल्या रीतीने होण्यासाठी त्यांनी विदेशात ग्रंथालय चळवळ चालविणाऱ्या अमेरीकेतील प्रसिद्ध ग्रंथपाल डब्ल्यू. ए. बोर्डेन या तज्ज्ञाची नेमणूक याकामी केली. आपल्या राज्यातील गावगाड्यातील लोकांनादेखील ग्रंथ मिळावेत म्हणून त्यांनी सार्वजनिक ग्रंथालयांची साखळी निर्माण केली. ग्रंथालयात चांगल्या पुस्तकांची उपलब्धता होण्यासाठी वेगवेगळ्या विषयांतील तज्ज्ञ मंडळींच्या साहाय्याने चांगली पुस्तके लिहून घेतली. दरबारात पगारी ग्रंथलेखक नेमून त्याद्वारे ग्रंथनिर्मिती केली आणि ग्रंथलेखनास प्रोत्साहन मिळण्यासाठी पारितोषिके दिली. इतर भाषांमधील उत्तम साहित्य मराठी, गुजराती आणि हिंदी भाषांत प्रकाशित व्हावे म्हणून त्यांनी आपल्या राज्यात भाषांतर विभाग सुरू केला होता. त्यासाठी दोन लक्ष रुपयांची तजवीज करून त्याच्या व्याजातून त्यांनी भाषांतरित ग्रंथनिर्मितीस चालना दिली. याद्वारे सयाजी साहित्यमालेत २०७ पुस्तके, तर सयाजी बालज्ञानमालेत ९५ पुस्तके प्रकाशित झाली होती. त्यांनी ज्ञानमंजूषाकोश, शास्त्रीय वाङ्मयकोश, महाराष्ट्र शब्दकोश, आहारकोश, श्री सयाजी शासन शब्दकल्पतरू हा आठ भाषांमधील राज्यव्यवहार कोश तयार करून प्रकाशित केला. त्यांनी 'पुस्तकालय' नावाचे गुजराती मासिक सुरू केले. त्याकाळी सयाजीराजांच्या प्रयत्नातून बडोदे संस्थानात १५०४ सार्वजनिक ग्रंथालय सुरू झाली. तसेच ग्रंथालयासाठी त्याकाळी २० लक्ष ५३ हजार रुपये त्यांनी खर्च केले.[२]

**सयाजीराजे गायकवाड : सहकार**

आपल्या संस्थानातील प्रजेला आर्थिक स्वावलंबी करण्यासाठी त्यांनी अनेक उपाययोजना केल्या. त्यातील एक महत्त्वाची योजना म्हणजे सहकारी चळवळ होय. महाराजांनी भारतातच नव्हे तर आशिया खंडात सर्वप्रथम सहकारी चळवळीचा पाया घातला. इ.स. १८८८ मध्ये बडोद्यात 'सहकारी कायदा' केला. आशिया खंडातील पहिली सहकारी बँक स्थापन केली. तसेच आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना काढला. देशातील शेतकऱ्यांच्या दुःख आणि दैन्याचे कारण शिक्षण आणि आर्थिक नियोजनाच्या अभावात आहे हे त्यांनी ओळखले होते. शेतकऱ्यांची आर्थिक गरिबी दूर करण्यासाठी सयाजीरावांनी शास्त्रीय पद्धतीची शेती आणि सहकार चळवळीनां विशेष महत्त्व दिले. आपल्या बडोदे संस्थानात



MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17

१८१४ मध्ये २३६ सहकारी संस्था निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले आणि त्यांना आर्थिक मदत केली होती. त्या काळात त्यामध्ये साडेचार लाख रुपये इतके भागभांडवल गुंतवले गेले होते.

**उद्योग व्यवसाय –**

''शेती व शेतकरी यांची उन्नती साधत असताना औद्योगिक प्रगतीकडे दुर्लक्ष करून चालायचे नाही. कारण राष्ट्रव्यवस्थेच्या दृष्टीने शेतीच्या बरोबरीने उद्योगधंद्याची वाढ होणे आवश्यक आहे. उद्योगधंद्याप्रीत्यर्थ राबवून घेता येईल अशी साधनसंपत्ती बडोदे राज्यात आहे. पक्का माल तयार करणारे कारखाने या राज्यात वाढावे म्हणून गेल्या पंचवीस वर्षांत अनेक प्रयत्न करण्यात आले व त्या प्रयत्नांमुळे काही नवीन कारखानेदेखील निघाले. तथापि, कारखाने निघण्याच्या कामाला जोम यावा म्हणून मी नव्या जुन्या कारखानदारांना कमी दराने कर्ज देण्याची योजना केली आहे. त्या योजनेचा फायदा आपल्या प्रजेपैकी विशेष उद्यमप्रिय असलेले लोक घेतील अशी आशा आहे.''[४] उद्योगधंद्याची वाढ करण्यासाठी सयाजीराजांनी सल्लागार मंडळ नेमले आणि त्यायोगे आपल्या संस्थानातील उद्योग व्यवसायाचा विकास साधला.

एक कर्तृत्ववान आणि प्रजाहितदक्ष, दूरदृष्टीचे जाणते राजे म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल. तत्कालीन भारतीय राजांमधले ते एकमेव प्रज्ञावान राजे होते. म्हणूनच जानेवारी १९२४ मध्ये बनारस हिंदू विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट पदवीने सन्मानित केले, तर २७ ऑगस्ट १९३९ च्या अमेरिका शिकागो येथील जागतिक सर्वधर्म परिषदेचे उद्‌घाटन महाराजांच्या हस्ते करण्यात आले. ऑक्टोबर १९३५ मध्ये ब्रिटिश लायब्ररी असोसिएशनच्या उपाध्यक्ष पदावर त्यांची सन्माननीय निवड करण्यात आली. अमेरिकन सरकारने गार्ड ऑफ ऑनर हा सन्मान देऊन त्यांना गौरविले होते. बहुआयामी लोककल्याणकारी राजा म्हणून सर्वसामान्यपणाकडून असामान्यपणाकडे जाणारा उत्तुंग प्रवास त्यांच्या जीवनात पाहायला मिळतो.

**संदर्भ सूची –**


१. बाबा, भांड लोकपाल राजा सयाजीराव गायकवाड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१५, पृ. क्र. २१ .
२. तत्रैव, पृ.४४.
३. लांडगे शिरीष , उत्कर्षवाटा, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१९, पृ.२२.
४. तत्रैव, पृ. २६.
५. तावरे स्नेहल, जीवनवेध, लीलावती प्रकाशन, पुणे, २०१४.
६. मोरे सदानंद, समाजसुधारक, सकाळ प्रकाशन, पुणे.